सत्यमेव जयते

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.

९३, मल्हार पेठ, सातारा.
दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५
ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in

पुण्यश्लोक 300

जा.क्र/जिवानिशा/अधिसुचना /४३७/२०२६ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - २३/०९/२०२६

## अधिसुचना

सातारा तालुका पोलीस ठाणे हद्दीतील, राष्ट्रीय महामार्ग ९६५ डी (NH-९६५D) वर अनुक्रमे वाढे आणि वडूथ गावा जवळ असलेले वेण्णा व कृष्णा नदीचे पूल हे ऐतिहासिक दगडी कमानीचे (Stone Masonry Arch) पूल आहेत. सदर पुलांची NHAI च्या प्रतिनिधींनी केलेल्या स्थळ पाहणी आणि तपशीलवार तपासणीवरून असे दिसून आले आहे की, मान्सून (पावसाळा) हंगामामुळे या पुलांची संरचनात्मक (structural) स्थिती अधिक खालावली आहे. पुलांमधून पाणी पाझर Content (seepages), किरकोळ संरचनात्मक तडे आणि कमानीच्या भागांमध्ये झीज झाल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या पावसाळ्यात सदर पुलांची संरचनात्मक चिंता वाढल्याचे लक्षात घेता सदर पुलावरुन जाणारी अवजड वाहतुक बंद करण्याबाबत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) कार्यालय पुणे यांनी कळविले आहे. तसेच सदर ठिकाणी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांचेकडुन प्राधान्य तत्त्वावर नवीन समांतर पुलांचे बांधकाम सुरु असुन, नविन पुलांचे बांधकाम पुढील वर्षी पुर्ण झाले नंतर या जुन्या पुलांवरील वाहतुक पूर्णपणे बंद करणे शक्य होईल असे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) कार्यालय पुणे यांनी पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे सातारा ते लोणंद (NH-९६५D) या महामार्गावरील अवजड वाहतुकीचे खालीलप्रमाणे नियोजन होणे आवश्यक आहे. त्याबाबतची अधिसुचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

मी निखील पिंगळे (भापोसे), पोलीस अधीक्षक सातारा मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये सातारा तालुका पोलीस ठाणे हद्दीतुन जाणारा सातारा ते लोणंद (NH-९६५D) या राष्ट्रीय महामार्गाच्या वाहतुक मार्गात बदल करुन वाहतुक सुरळीत राहणेकरीता दि. २८/०९/२०२६ रोजीचे ००.०१ पासुन ते २०/०६/२०२७ रोजीचे २३.५९ वा. पर्यतची खालील अधिसुचना पारित करीत आहे.

### वाहनांच्या वाहतुक मार्गातील बदलाबाबत
### वाहतुक मार्गातील बदल खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

१. लोणंद वरुन साताराकडे येणारी अवजड वाहने ही लोणंद वरुन खंडाळा/शिरवळ मार्गे पुणे बेंगलोर महामार्गावरुन साताराकडे जातील.

२. साताऱ्याकडुन वाढे फाटा मार्गे लोणंद/फलटण कडे जाणारी अवजड वाहने ही वाढे फाट्यावरुन न वळता सरळ पुणे बेंगलोर महामार्गावरुन खंडाळा/शिरवळ मार्गे लोणंद/फलटण कडे जातील.

३. सातारा बाजुकडुन फलटण कडे जाणारी अवजड वाहतुक ही बॉम्बे रेस्टारंट चौकातुन कोरेगाव - पुसेगाव - ताथवडे घाट मार्गे फलटण कडे जातील.

४. फलटण कडुन सातारा कडे येणरी अवजड वाहने ही, फलटण - ताथवडे घाट - पुसेगाव - कोरेगाव वरुन साताराकडे जातील.

Scanned with CamScanner

५. फलटण बाजुकडुन आदर्की मार्गे साताराकडे येणारी अवजड वाहतुक ही आदर्की फाटा (फौजी ढाबा) येथुन वाठार वरुन पिंपोडे बु. - सर्कलवाडी - शिरगाव घाट - जोशीविहीर वरुन पुणे बेंगलोर महामार्गावरुन साताराकडे जातील, किंवा आदर्की फाटा (फौजी ढाबा) येथुन लोणंद वरुन खंडाळा/शिरवळ मार्गे पुणे बेंगलोर महामार्गावरुन साताराकडे जातील.

६. राष्ट्रीय महामार्ग ९६५ डी (NH-९६५D) वर अनुक्रमे वाढे आणि वडूथ गावा जवळ असलेले वेण्णा व कृष्णा नदीवरील पूल हे अवजड वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत.

७. आत्यावश्यक सेवा मधील अवजड वाहने व शाळा व महाविद्यालय विद्यार्थ्यांची व नागरीकांची, महिलांची गैरसोय होवु नये या करीता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कडील रा.प.बसेस व स्कुल बसेस यांना राष्ट्रीय महामार्ग ९६५ डी (NH-९६५D) या मार्गावरील अनुक्रमे वाढे आणि वडूथ गावा जवळ असलेले वेण्णा व कृष्णा नदीवरील पुलावरुन येण्यासाठी व जाण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

८. राष्ट्रीय महामार्ग ९६५ डी (NH-९६५D) वरुन जाणाऱ्या सर्व प्रकारच्या हलक्या वाहनांच्या वाहतुक मार्गात कोणताही बदल करण्यात आलेला नाही सर्व हलकी वाहने आहे त्या मार्गाने ये - जा करतील.

तरी वरील वाहतुक ज्या ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. अशा सर्व ठिकाणी दिशा दर्शक फलक व त्याठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतुक मार्गात केलेल्या बदलासाठी सर्व नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवुन पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसुचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दि. २३/०९/२०२६ रोजी जारी करण्यात आली आहे.

SUPDT. OF POLICE SATARA

(निखील पिंगळे) भापोसे
पोलीस अधीक्षक सातारा

ठिकाण - सातारा
दिनांक - २३/०९/२०२६

प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे
   २/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.
२) मा. व्यवस्थापक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) पुणे.
३) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.
४) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता,लोकमत तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार,पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी
५) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, सोलापूर ग्रामीण, सांगली, कोल्हापूर.
   २/- सदर आदेशाची प्रसिध्दी आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक वृत्तपत्रामध्ये करणेस विनंती.
६) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.
७) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

<u>प्रत माहीतीसाठी सादर</u>

१) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.
२) मा.जिल्हाधिकारी सातारा.
३) मा.विभाग नियंत्रक रा.प. सातारा
४) पोलीस अधीक्षक,महामार्ग परिक्षेत्र पुणे.

Scanned with CamScanner